## *Appendix XV (ii)*, (Vide Article - 15.07)

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम-२००६ मधील तरतुदींनुसार गौण वनोपजांच्या वाहतूक परवाना देण्याच्या व्यवस्थेत सुधारणा करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसं-१०/२०१३/प्र.क्र.८५/फ-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० जुलै, २०१३.

वाचा :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१२/जमीन/३/वहका/प्र.क्र.१/भाग-६/०७१/१२१२, दिनांक ७.३.२०१३.

<u>शासन निर्णय :-</u>

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम- २००६ च्या नियम २ (१) (ड) अनुसार गौण वनोपजांच्या संदर्भात वाहतूक परवाना देण्याबाबत व्यवस्थेत सुधारणा करणे अभिप्रेत असून संदर्भात वाहतूक परवाना नियम ४ (१) (ई) अनुसार गठीत समिती किंवा ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे देण्याची तरतूद आहे.

२. त्यानुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या संदर्भिय पत्राद्वारे अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम- २००६ च्या कलम ३ (१) (सी) अंतर्गत मान्य वन हक्कांच्या अनुषंगाने गोळा केलेल्या गौण वनोपजांच्या वाहतूकीसाठी वाहतूक परवान्याचा नमूना मान्य करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

३. त्यानुसार संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त उक्त तरतुदींच्या अधिन राहून द्यावयाच्या वाहतूक परवान्याच्या नमुन्यास याद्वारे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. वाहतूक परवान्यासंदर्भातील कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे राहील :-

(a) सदर निर्गत परवान्याचा रंग पिवळा असावा.
(b) याचे मुद्रण शासकीय मुद्रणालयातून करण्यात येईल.
(c) मुद्रीत होणाऱ्या वाहतूक परवान्याच्या प्रारुपात एकसूत्रता राहावी, यासाठी तिन्ही प्रतींवर वरच्या उजव्या बाजूस या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक नमूद करणे आवश्यक राहील.
(d) शासकीय मुद्रणालयाकडून यावर (खालीलप्रमाणे) वॉटर मार्क अंकीत केल्या जाईल.
(e) सदर नमुना घडी पत्रक (३ घडीचे) पास चा राहील. त्यामध्ये स्थळप्रत, संबंधित बिट गार्डची प्रत, वाहतूककर्ताची प्रत याचा समावेश राहील.
(f) नमुन्याचे मागील बाजूस सदर नमुना कोणता गौणउपजासाठी लागू आहे, त्याची यादी व नमुन्यात माहिती भरण्यासाठी मार्गदर्शन चा समावेश राहील.
(g) वाहतूक पास जारी केल्यानंतर ४८ तासांच्या आत संबंधित ग्रामसभेकडून बिट गार्डची प्रत संबंधित बिट गार्डकडे देण्यात येईल.
(h) शासकीय मुद्रणालयाकडून मुद्रण झाल्यानंतर ५० पासाचे पुस्तकांचा पुरवठा मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांचे कार्यालयास करण्यात येईल व त्याची माहिती प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयास देण्यात येईल.
(i) विभागीय अधिकाऱ्याचे / उप वनसंरक्षकांचे कार्यालयीन शिक्का घडीचे रेषेवर दोन ठिकाणी जेथे घडीची रेषा आहे तेथे दोन्ही बाजूस अर्धा-अर्धा अशा स्वरुपाचा चिन्हांकित केला जाईल

४०३

(j) ग्रामसभांकडून संबंधीत वन परिक्षेत्र अधिकारी यांचेकडे निर्गत परवाना पुस्तक ची मागणीप्रमाणे विनामूल्य त्याचा पुरवठा करण्यात येईल. वनपरिक्षेत्र अधिकारी या निर्गत परवानाबाबत अभिलेख ठेवतील.

(k) एक निर्गत परवाना पुस्तक संपल्यानंतर Counterfoil (स्थळप्रत) ची पुस्तक संबंधीत वन कार्यालयास (जेथून प्राप्त झाले होते) परत करणे आवश्यक राहील.

(l) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम- २००६ तसेच मुंबई वन नियमावली, १९४२ या दोन्ही नियमावलीतील तरतुदींची सांगड असावी, या दृष्टीने मुंबई वन नियमावली, १९४२ नियम ६७ (१) अनुसार संबंधित मुख्य वनसंरक्षक किंवा यथास्थितीत उप वनसंरक्षक व उप विभागीय वन अधिकारी यांनी वाहतूक परवाना जारी करण्यासाठी संबंधित ग्रामसभेस प्राधिकृत करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

<u>सहपत्र : नमुन्याची प्रत.</u>

( संजीव गौड )
सह सचिव (वने)

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
३) प्रधान सचिव, ग्राम विकास व जल संधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
८) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०) अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.
११) पोलीस आयुक्त, मुंबई.
१२) आयुक्त, ठाणे महानगर पालिका, ठाणे.
१३) आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक.
१४) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगर पालिका, कल्याण.
१५) आयुक्त, नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई.
१६) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगर पालिका, भाईंदर.
१७) आयुक्त, भिवंडी महानगर पालिका, भिवंडी.
१८) आयुक्त, उल्हासनगर महानगर पालिका, उल्हासनगर.
१९) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
२०) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई.
२१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२२) जिल्हाधिकारी, (सर्व).
२३) पोलीस अधिक्षक, (सर्व).
२४) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) / सर्व वनसंरक्षक (प्रादेशिक)/ सर्व संबंधित उपवनसंरक्षक.
२५) अपर आदिवासी आयुक्त, (सर्व).

शासन निर्णय---

## निर्गत परवाना (स्थळप्रत)

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ चे कलम ३(१)(c) अंतर्गत मान्य वनहक्काचे अनुषंगाने गोळा केलेल्या गौणवनोपजाचे वाहतुकीकरीता निर्गत परवाना**

गौण वनोपज

पुस्तक क्रमांक ---------- परवाना क्रमांक ---------- दिनांक ----------

१. जिल्हा---------- तालुका---------- गाव----------

२. जिल्हास्तरीय समितीने वनहक्क मान्य केल्याचा क्रमांक व दिनांक----------

३. ग्रामसभेचे नाव ----------

४. जेथून माल हस्तांतरणात येत आहे तो वनखंड किंवा भाग क्र. आणि पारंपारिक किंवा गट किंवा अन्य घटक (नाव) ----------

५. वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव----------

६. गौण वनोपजाचे वर्णन (प्रजातीचे नाव), वस्तु प्रकार, दर्जा, मोजमाप, संख्या / नग / वजन इत्यादी----------

७. वाहतुकीचे साधन ----------

८. गाडीचा क्रमांक (असल्यास) ----------

९. वाहन चालकाचे नाव ----------

१०. जाण्याचे ठिकाण----------

११. गौण वनोपज वाहतुकीचा मार्ग----------

१२. परवान्याची कालमर्यादा----------

परवाना देणाऱ्याची स्वाक्षरी व
ग्रामसभेचा शिक्का

शासन निर्णय---

## निर्गत परवाना (चेक गार्डची प्रत)

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ चे कलम ३(१)(c) अंतर्गत मान्य वनहक्काचे अनुषंगाने गोळा केलेल्या गौणवनोपजाचे वाहतुकीकरीता निर्गत परवाना**

गौण वनोपज

पुस्तक क्रमांक ---------- परवाना क्रमांक ---------- दिनांक ----------

१. जिल्हा---------- तालुका---------- गाव----------

२. जिल्हास्तरीय समितीने वनहक्क मान्य केल्याचा क्रमांक व दिनांक----------

३. ग्रामसभेचे नाव ----------

४. जेथून माल हस्तांतरणात येत आहे तो वनखंड किंवा भाग क्र. आणि पारंपारिक किंवा गट किंवा अन्य घटक (नाव) ----------

५. वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव----------

६. गौण वनोपजाचे वर्णन (प्रजातीचे नाव), वस्तु प्रकार, दर्जा, मोजमाप, संख्या / नग / वजन इत्यादी----------

७. वाहतुकीचे साधन ----------

८. गाडीचा क्रमांक (असल्यास) ----------

९. वाहन चालकाचे नाव ----------

१०. जाण्याचे ठिकाण----------

११. गौण वनोपज वाहतुकीचा मार्ग----------

१२. परवान्याची कालमर्यादा----------

परवाना देणाऱ्याची स्वाक्षरी व
ग्रामसभेचा शिक्का

शासन निर्णय---

## निर्गत परवाना (वाहतुकदाराची प्रत)

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ चे कलम ३(१)(c) अंतर्गत मान्य वनहक्काचे अनुषंगाने गोळा केलेल्या गौणवनोपजाचे वाहतुकीकरीता निर्गत परवाना**

गौण वनोपज

पुस्तक क्रमांक ---------- परवाना क्रमांक ---------- दिनांक ----------

१. जिल्हा---------- तालुका---------- गाव----------

२. जिल्हास्तरीय समितीने वनहक्क मान्य केल्याचा क्रमांक व दिनांक----------

३. ग्रामसभेचे नाव ----------

४. जेथून माल हस्तांतरणात येत आहे तो वनखंड किंवा भाग क्र. आणि पारंपारिक किंवा गट किंवा अन्य घटक (नाव) ----------

५. वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव----------

६. गौण वनोपजाचे वर्णन (प्रजातीचे नाव), वस्तु प्रकार, दर्जा, मोजमाप, संख्या / नग / वजन इत्यादी----------

७. वाहतुकीचे साधन ----------

८. गाडीचा क्रमांक (असल्यास) ----------

९. वाहन चालकाचे नाव ----------

१०. जाण्याचे ठिकाण----------

११. गौण वनोपज वाहतुकीचा मार्ग----------

१२. परवान्याची कालमर्यादा----------

परवाना देणाऱ्याची स्वाक्षरी व
ग्रामसभेचा शिक्का

(मागील बाजू)

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६, चे कलम २(आय) अन्वये नमूद गौण वनउपज खालीलप्रमाणे आहे.**

बांबू, खुरटी झाडी, झोड, बेत, कोसा, रेशमी किड्यांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू किंवा केंदू पत्ता, औषधी वनस्पती आणि कंदमुळे, मुळे, लहान झाडे यासारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनाचा समावेश होतो.

**मार्गदर्शक माहिती**

पुस्तक क्रमांक, परवाना क्रमांक हे छापील क्रमांक शासकीय प्रेसद्वारे देण्यात येतील. त्याऐवजी प्रत्येक पृष्ठावर पुस्तक क्रमांक संबंधित पुस्तकाचे कव्हरवर दिलेला पुस्तक क्रमांक लिहिण्यात यावा.

अनुक्रमांक १ यामध्ये जिल्हा, तालुका गावाचे नांव लावे.

अ.क्र. २ ते १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती भरावी.

अ.क्र. ११ मध्ये सुरुवातीचे स्थळापासून जिथून मालाची वाहतूक होणार आहे ते जेथे अंतिम माल खाली करावयाचा आहे. त्या ठिकाणाचे नाव व कोणत्या मार्गाने जायचे आहे त्या मार्गाचे मुख्य गावाची नावे द्यावी.

अ.क्र. १२ परवान्याची कालमर्यादा वाहतुकीचे साधन व अंतर विचारात घेऊन परवाना देणाऱ्यांनी नमूद करावी.

(मागील बाजू)

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६, चे कलम २(आय) अन्वये नमूद गौण वनउपज खालीलप्रमाणे आहे.**

बांबू, खुरटी झाडी, झोड, बेत, कोसा, रेशमी किड्यांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू किंवा केंदू पत्ता, औषधी वनस्पती आणि कंदमुळे, मुळे, लहान झाडे यासारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनाचा समावेश होतो.

**मार्गदर्शक माहिती**

पुस्तक क्रमांक, परवाना क्रमांक हे छापील क्रमांक शासकीय प्रेसद्वारे देण्यात येतील. त्याऐवजी प्रत्येक पृष्ठावर पुस्तक क्रमांक संबंधित पुस्तकाचे कव्हरवर दिलेला पुस्तक क्रमांक लिहिण्यात यावा.

अनुक्रमांक १ यामध्ये जिल्हा, तालुका गावाचे नांव लावे.

अ.क्र. २ ते १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती भरावी.

अ.क्र. ११ मध्ये सुरुवातीचे स्थळापासून जिथून मालाची वाहतूक होणार आहे ते जेथे अंतिम माल खाली करावयाचा आहे. त्या ठिकाणाचे नाव व कोणत्या मार्गाने जायचे आहे त्या मार्गाचे मुख्य गावाची नावे द्यावी.

अ.क्र. १२ परवान्याची कालमर्यादा वाहतुकीचे साधन व अंतर विचारात घेऊन परवाना देणाऱ्यांनी नमूद करावी.

(मागील बाजू)

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६, चे कलम २(आय) अन्वये नमूद गौण वनउपज खालीलप्रमाणे आहे.**

बांबू, खुरटी झाडी, झोड, बेत, कोसा, रेशमी किड्यांचे कोश, मध, मेण, लाख, तेंदू किंवा केंदू पत्ता, औषधी वनस्पती आणि कंदमुळे, मुळे, लहान झाडे यासारख्या इमारती लाकूड नसलेल्या सर्व वनोत्पादनाचा समावेश होतो.

**मार्गदर्शक माहिती**

पुस्तक क्रमांक, परवाना क्रमांक हे छापील क्रमांक शासकीय प्रेसद्वारे देण्यात येतील. त्याऐवजी प्रत्येक पृष्ठावर पुस्तक क्रमांक संबंधित पुस्तकाचे कव्हरवर दिलेला पुस्तक क्रमांक लिहिण्यात यावा.

अनुक्रमांक १ यामध्ये जिल्हा, तालुका गावाचे नांव लावे.

अ.क्र. २ ते १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती भरावी.

अ.क्र. ११ मध्ये सुरुवातीचे स्थळापासून जिथून मालाची वाहतूक होणार आहे ते जेथे अंतिम माल खाली करावयाचा आहे. त्या ठिकाणाचे नाव व कोणत्या मार्गाने जायचे आहे त्या मार्गाचे मुख्य गावाची नावे द्यावी.

अ.क्र. १२ परवान्याची कालमर्यादा वाहतुकीचे साधन व अंतर विचारात घेऊन परवाना देणाऱ्यांनी नमूद करावी.